RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-ल

वर्ष १०, अंक १४] बुधवार, जून १९, २०२४/ज्येष्ठ २९, शके १९४६ [पृष्ठे १९, किंमत : रुपये १६.००

**असाधारण क्रमांक ६६**

### प्राधिकृत प्रकाशन

**(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.**

### उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ जून, २०२४.

**अधिसूचना**

**कारखाने अधिनियम, १९४८.**

क्रमांक एफएसी-२०२३/प्रक्र. ५२ (भाग-२)/कामगार-४.—कारखाने अधिनियम, १९४८ (१९४८ चा ६३) महाराष्ट्र राज्याला लागू असताना त्याची कलमे ४१, ११२ आणि ११५ द्वारे तसेच साधारण वाक्खंड अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) च्या कलम २३ खंड (३) नुसार, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करण्याऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षण) नियम, २०१४ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त अधिनियमाच्या कलम ११५, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत :—

(१) या नियमांस, महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षण) (सुधारणा) नियम, २०२४ असे म्हणावे.

(२) महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षण) नियम, २०२४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य नियम" असा केला आहे) याच्या नियम १ मध्ये, पोट-नियम (२) मधील, खंड (तीन) मध्ये, "२५०" या आकडेवारीऐवजी, "५०" ही आकडेवारी दाखल करण्यात येईल.

(३) मुख्य नियमाच्या नियम २ मध्ये, पोट-नियम (१) मधील, खंड (आठ) मध्ये, "व्यक्ती" या मजकुरानंतर, "किंवा संस्था" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

(४) मुख्य नियमाच्या नियम ३ यास, त्याचा पोट-नियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल आणि त्याच्या,—

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोट-नियम (१) मधील, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण.–** या पोट-नियमाच्या प्रयोजनासाठी, "सयंत्र कर्मचाऱ्यांचा चमू" याचा अर्थ, कारखान्याच्या सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी, परिरक्षण, प्रकल्प व उत्पादन, इत्यादीसारख्या विविध विभागांमधील व्यक्तींचा चमू, असा आहे. जर एकाच भोगवटादाराचे विविध कारखाने असतील तर, इतर ठिकाणातील सयंत्र कर्मचाऱ्यांचा चमू, अंतर्गत लेखा परीक्षण करू शकेल.";

(ख) अशा प्रकारे, नवीन क्रमांक दिलेल्या पोट-नियम (१) नंतर, पुढील पोट-नियम जादा दाखल करण्यात येईल :—

"(२) अंतर्गत लेखा परीक्षण पूर्ण झाल्यानंतर, भोगवटादार, निरीक्षणांचा कार्यकारी सारांश आणि लेखा परिक्षणाचा कृती अहवाल, असे सुरक्षा लेखा परीक्षण पूर्ण झाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, कारखान्यांच्या मुख्य निरीक्षकांच्या संबंधित कार्यालयास सादर करील.".

(५) मुख्य नियमाच्या नियम ४ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"४. भारतीय मानक, आयएस १४४८९ः व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य लेखा परीक्षण पद्धती संहिता, त्याच्या नवीनतम आवृत्तीसह,यामध्ये निर्धारित केलेल्या मानकांनुसार सुरक्षा लेखा परीक्षण किंवा संयंत्र कर्मचाऱ्यांच्या चमूद्वारे, सुरक्षा लेखा परीक्षण करण्यात येईलः

परंतु, मुख्य निरीक्षकास, सर्व किंवा विशिष्ट वर्गाच्या कारखान्यांचे सुरक्षा परिक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ, वरील मानकांशिवाय, स्वतंत्र तपासणी सूच्या आणि प्रक्रिया किंवा अतिरिक्त तपासणी सूच्या निर्धारित करता येतील. वर निर्धारित केल्याप्रमाणे, स्वतंत्र तपासणी सूच्या आणि प्रक्रिया किंवा अतिरिक्त तपासणी सूच्या, आवश्यक असल्यास, दरवर्षी जानेवारी महिन्यात फेरबदल करता येतील, आणि उक्त संचालनालयाद्वारे, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील."

(६) मुख्य नियमाच्या नियम ५ मध्ये,—

(क) पोट-नियम (२) मधील,—

(एक) "किमान तीन व्यक्ती" या मजकुरापूर्वी, "ज्या, रासायनिक, विद्युत व यांत्रिकी शाखेमधील पदवी धारण करतात अशा," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) पहिल्या परंतुकामध्ये, "धारण करणाऱ्या" या मजकुरानंतर, "आणि ज्या, रासायनिक, विद्युत व यांत्रिकी शाखेमधील पदवी धारण करतात अशा" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(तीन) दुसरे परंतुक वगळण्यात येईल ;

(ख) पोट-नियम (३) मधील, "किंवा महासंचालक, कारखाने सल्ला सेवा व श्रम संस्था आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषद किंवा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील उपसंचालक या पदापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पदाचा किमान १५ वर्षांचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीला" हा मजकूर वगळण्यात येईल.

**७.** मुख्य नियमाच्या नियम ६ ऐवजी, पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

"६. (१) सुरक्षा लेखा परीक्षण करण्यासाठी सुरक्षा लेखा परिक्षक म्हणून मान्यता देण्याचे प्रमाणपत्राकरीता अर्ज,—

(क) एखाद्या व्यक्तीद्वारे, एक हजार रुपये इतक्या परीक्षा शुल्कासह, नमुना-अ मध्ये,

(ख) एखाद्या संस्थेद्वारे, जी व्यक्ती, सुरक्षा लेखापरीक्षकाच्या परीक्षेसाठी बसेल अशा प्रत्येक व्यक्तीप्रमाणे, एक हजार रुपये इतक्या परीक्षा शुल्कासह, नमुना-ब मध्ये,

इलेक्ट्रॉनिक पद्धतीने, वर्षाच्या जानेवारी ते मार्च आणि जुलै ते सप्टेंबर या दरम्यान मुख्य निरीक्षकाकडे करण्यात येईल. ३१ मार्चनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा, त्यानंतरच्या कालावधीत, म्हणजेच, जुलै ते सप्टेंबर या कालावधीत विचार करण्यात येईल आणि ३० सप्टेंबरनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा, पुढील कालावधीत, म्हणजेच, जानेवारी ते मार्च या कालावधीत विचार करण्यात येईल.

(२) या नियमांनुसार, नमुना-अ मध्ये रीतसर केलेला अर्ज प्राप्त झाल्यावर, मुख्य निरीक्षक, त्याची छाननी करील आणि पात्र अर्जदारांची, ऐंशी गुणांची लेखी परीक्षा व वीस गुणांची मुलाखत घेईल. मुख्य निरीक्षक, लेखी परीक्षेत व मुलाखतीत सुद्धा पन्नास टक्के किंवा अधिक गुण मिळविणाऱ्या निवडक अर्जदारांच्या यादीची, मान्यतेसाठी शासनाकडे शिफारस करील. मुख्य निरीक्षक, निवडलेल्या अर्जदारांची यादी,—

(एक) जानेवारी ते मार्च या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांसाठी दरवर्षी एप्रिलच्या अखेरीस, आणि

(दोन) जुलै ते सप्टेंबर या कालावधीत प्राप्त झालेल्या अर्जांसाठी दरवर्षी ऑक्टोबरच्या अखेरीस, पाठवील :

परंतु, मुख्य निरीक्षक, केवळ अशाच संस्थांच्या यादीची, मान्यतेसाठी शासनाकडे शिफारस करील की, ज्या संस्थानकडील नियुक्त केलेल्या किमान तीन व्यक्तींकडे रासायनिक, विद्युत व यांत्रिकी शाखेची पदवी आहे आणि अशा सर्व व्यक्तींनी, लेखी परीक्षेत व मुलाखतीत पन्नास टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवले आहेत.

(३) मुख्य निरीक्षकाकडून शिफारस यादी मिळाल्यावर, राज्य शासन, अर्जदाराला सुरक्षा लेखा परिक्षक म्हणून मान्यता देऊ शकेल किंवा मुख्य निरीक्षकाकडून शिफारसी मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत, त्याची कारणे विनिर्दिष्ट केल्यानंतर, अर्ज नाकारू शकेल.

(४) शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर, अर्जदार, मुख्य निरीक्षकाने कळविल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, मुख्य निरीक्षकाकडे वीस हजार रुपये इतके मान्यता शुल्क इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जमा करील. मुख्य निरीक्षक, शुल्क मिळाल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत, अर्जदारास नमुना-क मध्ये मान्यता प्रमाणपत्र देईल. उक्त कालावधीत, शुल्क जमा करण्यात निष्फळ ठरल्यावर अर्ज रद्द करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

(५) पोट-नियम (४) अन्वये दिलेली मान्यता, मान्यता प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल.

(६) जो सुरक्षा लेखा परिक्षक, त्याचे मान्यता प्रमाणपत्र नूतनीकरण करू इच्छितो तो सुरक्षा लेखा परिक्षक, मान्यता प्रमाणपत्राच्या वैधतेचा कालावधी समाप्त होण्याच्या साडेतीन महिने अगोदर, नमुना- अ, किंवा यथास्थिति, नमुना- ब मध्ये मुख्य निरीक्षकाकडे अर्ज करील.

(७) अर्जदार, सुरक्षा लेखापरीक्षक म्हणून मान्यता प्रमाणपत्राच्या नूतनीकरण करण्यास पात्र असणार नाही, जर,—

(क) मुख्य निरीक्षकाने यापूर्वीच अशी मान्यता रद्द केली असेल तर ; किंवा

(ख) ज्याचा अहवाल मुख्य निरीक्षकाकडे पाठविला जातो अशा पुढील मुद्यांबाबत सह किंवा उपमुख्य निरीक्षकाने मूल्यनिर्धारण व छाननी केलेल्या त्याच्या पात्रतेच्या संबंधातील कामगिरीच्या मूल्यमापनात त्याला सत्तर टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळाले असतील तर, म्हणजे :—

(एक) व्यवस्थापनाकडून किंवा कामगारांकडून सुरक्षा परिक्षणाशी संबंधित असणारी कोणतीही तक्रार आहे का?

(दोन) सुरक्षा लेखापरीक्षण अहवाल, विहित मुदतीत भोगवटादारास सादर करण्यात आला होता किंवा कसे?

(तीन) सुरक्षा लेखापरीक्षण अहवालामध्ये नमूद केलेले तपशील आणि कारखाना निरीक्षणालयाच्या अधिकाऱ्याला आढळलेली वास्तविक तथ्ये यामध्ये काही तफावत आढळून आली आहे का?

**स्पष्टीकरण.–** सह किंवा उप मुख्य निरीक्षकास, कारखान्याला भेट देऊन लेखा परीक्षण केलेल्या कारखान्यांपैकी, किमान एक किंवा पाच टक्के कारखान्यांची पडताळणी करता येईल.

(चार) सुरक्षा लेखापरीक्षकाने, कोणत्याही उत्पादनाशी संबंधित असणारी कोणतीही माहिती, वाणिज्यिक व्यावसायिक गुपिते किंवा सुरक्षा लेखापरीक्षण करताना, त्याला ज्ञात झालेली कोणतीही प्रक्रियात्मक गुपिते उघड केली आहेत किंवा कसे?

(पाच) सुरक्षा लेखापरीक्षकाने, एकाच कारखान्याचे सलग दोन वेळा सुरक्षा लेखा परीक्षण केले आहे किंवा कसे?

(सहा) सुरक्षा लेखापरीक्षकाने, गेल्या दोन वर्षांत कारखान्याला, निरीक्षण, चाचणी, साहित्य पुरवठा किंवा सुरक्षेशी संबंधित इतर कोणत्याही सेवा या संबंधात कोणतीही सेवा पुरविली आहे किंवा कसे ?

(सात) या नियमांमध्ये नमूद केलेल्या तपासणी सूचीनुसार आणि मानकांनुसार सुरक्षा लेखा परीक्षण केले आहे किंवा कसे ?

(आठ) मान्यता प्रमाणपत्राची वैधता संपल्यानंतर सुरक्षा लेखा परीक्षण केले आहे किंवा कसे ?

(नऊ) सुरक्षा लेखापरीक्षकाने, भोगवटादाराला सुरक्षा लेखा परीक्षण सादर केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांनंतर केलेल्या कारवाईची पडताळणी करण्यासाठी कारखान्याला भेट दिली आहे किंवा कसे आणि अनुसूची-तीनमधील अहवाल संचालनालयाच्या संबंधित कार्यालयास सादर केला आहे किंवा कसे ?

(दहा) नमुना-क मध्ये विहित केलेल्या शर्तींचे कोणतेही उल्लंघन केले आहे किंवा कसे ?

(अकरा) प्रमाणपत्राच्या वैधतेच्या कालावधीत, सुरक्षा लेखा परिक्षक, कोणत्याही संस्थेने किंवा संघटनेने जसे कि, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, नारायण मेघाजी लोखंडे श्रम विज्ञान संस्थेने, कारखाना सल्ला सेवा व कामगार संस्था महासंचालनालय,राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने, आपत्ती व्यवस्थापन संस्थेने, राष्ट्रीय व्यावसायिक आरोग्य संस्था, इतर कोणत्याही शासकीय किंवा निमशासकीय संस्था किंवा औद्योगिक सुरक्षा व आरोग्य क्षेत्रात काम करणाऱ्या नामांकित खाजगी संस्था यांनी आयोजित केलेल्या किमान चार प्रशिक्षण कार्यक्रमांना उपस्थित राहिला आहे किंवा कसे ?

**स्पष्टीकरण.–** मुख्य निरीक्षक, मुद्दा (एक) ते (दहा) साठी मिळालेले एकूण गुण एकत्र करील आणि त्यानुसार, सरासरीचे मूल्यमापन करील. संपूर्ण सुरक्षा लेखा परीक्षण मूल्यनिधारणासाठी मुद्दा (एक) ते (दहा) साठी कमाल ऐंशी गुण असतील आणि मुद्दा (अकरा) साठी वीस गुण असतील.

(८) मान्यतेच्या नुतनीकरणासाठी प्राप्त झालेल्या अर्जांचे, असे अर्ज प्राप्त झाल्याच्या तारखेपासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, मुख्य निरीक्षकांद्वारे मूल्यांकन आणि छाननी करण्यात येईल. त्यानंतर, मुख्य निरीक्षक, मान्यता प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाची शिफारस यादी,मान्यतेसाठी शासनाकडे पाठवील.जर सुरक्षा लेखापरीक्षकाने, पोट-नियम (७) च्या खंड (ख) च्या उप-खंड (दोन), (चार), (पाच) आणि (अकरा) मध्ये निर्दिष्ट केलेल्या आवश्यकतांचे पालन केलेले नाही असे आढळून आले असेल तर, मुख्य निरीक्षक, मान्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण करण्याचे नाकारण्याची शिफारस शासनाकडे करील.

(९) शासन, मान्यता प्रमाणपत्र देण्यासाठी शिफारस केलेली यादी प्राप्त झाल्यापासून साठ दिवसांच्या आत, मान्यताप्राप्त सुरक्षा लेखापरीक्षकाची यादी मुख्य निरीक्षकाकडे पाठवील.

(१०) शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर, अर्जदार, दहा हजार रुपये इतके नूतनीकरण शुल्क इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मुख्य निरीक्षकाला प्रदान करील आणि त्यानंतर, मुख्य निरीक्षक, अर्जदारास नमुना- क मध्ये मान्यता प्रमाणपत्र देईल.

(११) मुख्य निरीक्षक, सुरक्षा लेखापरीक्षकाला बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि राज्य शासनाच्या मान्यतेनंतर, जर त्यास,—

(एक) सुरक्षा लेखापरीक्षकाने, मान्यता प्रमाणपत्रामध्ये निविष्ट केलेल्या कोणत्याही किंवा मान्यता प्रमाणपत्राच्या नूतनीकरणाच्या शर्तींचे उल्लंघन केले आहे ; किंवा

(दोन) सुरक्षा लेखापरीक्षकाने, अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा या नियमांचे उल्लंघन करून, सुरक्षा लेखा परीक्षण केले आहे अथवा अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या उद्देशांशी किंवा प्रयोजनांशी विसंगत असेल अशा रीतीने कृती केली आहे अथवा अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये आवश्यक असलेली कृती करण्याचे टाळलेले आहे किंवा कृती करण्यास निष्फळ ठरलेला आहे ; किंवा

(तीन) सुरक्षा लेखापरीक्षकाचे काम असमाधानकारक असल्याचे आढळले आहे आणि मुख्य निरीक्षकाने, अशा सुरक्षा लेखापरीक्षकाला दोन वेळा इशारा नोटीस दिलेली आहे, असा विश्वास ठेवण्यास कारण असेल तर,तो मान्यता प्रमाणपत्र रद्द करू शकेल.".

८. मुख्य नियमाच्या नियम ७ मध्ये,—

(क) "तसे कळवील" या मजकुराऐवजी, "इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कळवील" हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि

(ख) “पंधरा” या मजकुराऐवजी, “सात” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

**९.** मुख्य नियमाच्या नियम ७ नंतर, पुढील नियम समाविष्ट करण्यात येईल :—

“७ क. (१) सुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी, आवश्यक असलेले किमान मनुष्य दिवस खालीलप्रमाणे असतील, म्हणजेच :—

(क) मोठ्या अपघाताचे धोके असलेले कारखाने आणि धोकादायक प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांसाठी:-

(एक) पन्नास कामगारांपर्यंत कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, एक मनुष्य दिवस;

(दोन) एकावन्न ते एकशे पन्नास कामगारांपर्यंत कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, दोन मनुष्य दिवस;

(तीन) एकशे एकावन्न ते पाचशे कामगारांपर्यंत कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, तीन मनुष्य दिवस;

(चार) पाचशेपेक्षा अधिक कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, चार मनुष्य दिवस;

(ख) मोठ्या अपघाताचे धोके असलेले कारखाने आणि धोकादायक प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यां व्यतिरिक्त इतर कारखाने :-

(एक) एकावन्न ते दोनशे पन्नास कामगारांपर्यंत कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, दोन मनुष्य दिवस ;

(दोन) दोनशे एकावान्न ते एक हजार कामगारांपर्यंत कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, तीन मनुष्य दिवस ;

(तीन) एक हजारापेक्षा अधिक कामगार काम करीत असणाऱ्या कारखान्याच्या बाबतीत, चार मनुष्य दिवस.

(२) सुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी आवश्यक असलेला कालावधी, पंधरा दिवसांपेक्षा अधिक नसेल.

**७-ख.** पुढील प्रकारच्या कारखान्यांमधील मान्यता प्रमाणपत्र असलेल्या संस्थेद्वारेच केवळ सुरक्षा लेखापरीक्षण करण्यात येईल, म्हणजेच :—

(क) मोठ्या अपघाताचे धोके असलेले कारखाने ;

(ख) धोकादायक प्रक्रिया पार पाडणारे आणि दोनशे पन्नासपेक्षा अधिक कामगार काम करीत असणारे कारखाने ;

(ग) नियम १ च्या पोट-नियम (२) (एक) व (दोन) अंतर्गत समाविष्ट नसलेले आणि एक हजारापेक्षा अधिक कामगार काम असलेले इतर कारखाने :

परंतु, खंड (ग) मध्ये नमूद केलेल्या कारखान्यांसाठी, रासायनिक अभियंता व्यक्तीचा लेखापरीक्षण चमूत समावेश करणे अनिवार्य नाही.”

**१०.** मुख्य नियमाच्या नियम ९ यास, त्याचा पोट-नियम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल; आणि असा नवीन क्रमांक दिलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

“(२) सुरक्षा लेखापरीक्षक, संबंधित कारखान्याच्या भोगवटादाराने सादर केलेल्या कृती अहवालाची पडताळणी करण्यासाठी भोगवटादारास बाह्य सुरक्षा लेखापरीक्षण अहवाल सादर केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांची मुदत संपल्यानंतर एका महिन्याच्या आत, कारखान्याला भेट देईल आणि तो अहवाल, अनुसूची- तीनमधील औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या संबंधित कार्यालयास व त्याची एक प्रत भोगवटादारास सादर करेल.”

**११.** मुख्य नियमांस जोडलेल्या अनुसूची - १ मध्ये,—

(एक) खंड १ ऐवजी खालील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"(१) अर्जदार रासायनिक, यांत्रिकी, विद्युत किंवा उत्पादन अभियांत्रिकी शाखेतील पदवी धारण करील आणि कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया, परिरक्षण, संकल्पचित्र, प्रकल्प किंवा सुरक्षितता विभाग यामधील पर्यवेक्षक किंवा त्यावरील पदाचा दहा वर्षांचा अनुभव असेल, आणि तंत्रशिक्षण मंडळ किंवा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठ यांच्याकडून मान्यताप्राप्त असलेल्या औद्योगिक सुरक्षे मधील एक वर्षाची पदविका; किंवा",

(दोन) उप-खंड (दोन) व (तीन) वगळण्यात येतील;

(तीन) उप-खंड (चार) मधील,

(क) "किंवा पदविका"हा मजकूर वगळण्यात येईल;

(ख) "पंधरा" या मजकुराऐवजी, "पाच" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) खंड ३ ऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

३. "ज्या अर्जदारांचे वय अठावन्न वर्षांपेक्षा अधिक आहे तो अर्जदार, सुरक्षा लेखापरीक्षक म्हणून मान्यता मिळविण्यासाठी किंवा त्याच्या नुतनीकरणासाठी अर्ज करण्यास पात्र असणार नाहीत."

**१२.** मुख्य नियमांना जोडलेल्या अनुसूची-२ ऐवजी, पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

**"अनुसूची- २**

(नियम ८ व ९ (१) पहा)

**सुरक्षा लेखापरीक्षण अहवालाचा नमुना**

**भाग-अ**

**(सुरक्षा लेखापरीक्षकाने सादर करावयाचा)**

(१) कारखान्याचे नाव व पत्ता :

(२) भोगवटादाराचे नावः

(३) (क) सुरक्षा लेखापरीक्षणाच्या सुरुवातीच्या बैठकीची तारीख व वेळः

(ख) सुरक्षा लेखापरीक्षणाच्या अखेरच्या बैठकीची तारीख व वेळः

(ग) सुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी घेतलेले एकूण मनुष्य दिवसः

(४) कच्च्या मालाची यादी तसेच त्याचे कमाल साठवणूक प्रमाण व त्याची साठवणूक पद्धतीः

(५) तयार उत्पादनांची यादी तसेच त्याचे कमाल साठवणूक प्रमाण व त्याची साठवणूक पद्धतीः

(६) उत्पादन प्रक्रियेचा प्रवाह तक्ता (फ्लो चार्ट) (स्वतंत्र पेपर जोडावे):

(७) महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ११४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, कारखान्यात केलेल्या धोकादायक कामांची यादीः

(८) (क) सुरक्षा लेखापरीक्षकाचे नाव/नावेः

(ख) प्रमाणपत्र क्रमांक आणि त्याचा वैधता कालावधीः

(९) जोडलेला सुरक्षा लेखापरीक्षण अहवाल भारतीय मानक, आयएस १४४८९ः व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य लेखापरीक्षण पद्धतीबाबत संहिता, किंवा संबंधित वेळी प्रचलित असलेल्या अशा कोणत्याही मानकांनुसार, यापैकी, जे अलीकडील असेल त्या,मानकांनुसार आहे किंवा कसेः (भारतीय मानक,आयएस १४४८९ः व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य लेखा परीक्षण पद्धतीबाबत संहिता या व्यतिरिक्त वापरलेली मानके, तपासणी सूची, मार्गदर्शक तत्वे नमूद करा).

(शिफारसींसह सविस्तर सुरक्षा लेखापरीक्षण अहवाल जोडावयाचा आहे.)

कारखान्याला सुरक्षा लेखा परीक्षण अहवाल सादर केल्याची तारीख :

सुरक्षा लेखापरीक्षकाची/परिक्षकांची किंवा सुरक्षा लेखा परीक्षण करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांची/ कर्मचाऱ्यांची डिजिटल स्वाक्षरी.

अंतर्गत सुरक्षा लेखा परिक्षणाच्या बाबतीत.

सयंत्र कर्मचारी चमूच्या स्वाक्षऱ्या.

**भाग-ब**

**(भोगवटादाराने सादर करावयाचा)**

सुरक्षा लेखापरीक्षकाकडून सुरक्षा लेखापरीक्षण अहवाल मिळाल्याची तारीख :

मी, ............................................ खाली स्वाक्षरी करणारा, ................................... येथे स्थित असलेल्या कारखान्याचा भोगवटादार असून याद्वारे घोषित करतो की, ...................... या नावाच्या सुरक्षा लेखापरीक्षकाने/परिक्षकांनी सुरक्षा लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेल्या निष्कर्षांचे व शिफारशींचे सखोल पुनर्विलोकन केले आणि त्या आधारे यथोचित कारवाई केली आहे.

सुरक्षा लेखापरीक्षण अहवालाच्या प्रतिसादार्थ, मी यथोचित उपाययोजना केल्या आहेत आणि त्याचा अहवाल सोबत जोडलेला आहे.

**भोगवटादाराची डिजिटल स्वाक्षरी.**

**अनुसूची- ३**

(नियम ९(२) पहा)

**कृती अहवालाच्या पडताळणीचा नमुना**

(१) कारखान्याचे नाव व पत्ता :

(२) भोगवटादाराचे नाव :

(३) सुरक्षा लेखापरीक्षकाचे नावः

(४) सुरक्षा लेखापरीक्षणाची तारीख :

(५) सुरक्षा लेखापरीक्षण अहवाल भोगवटादाराला सादर केल्याची तारीख :

(६) भोगवटादाराने सादर केलेल्या कृती अहवालाची तारीखः

(७) कृती अहवालाची पडताळणी करण्यासाठी भेट दिल्याची तारीख :

(८) निरीक्षणाचे पालन न केल्याचा तपशील, असल्यासः

मी, ........................................, याद्वारे असे घोषित करतो की, मी, सुरक्षा लेखापरीक्षण अहवालात नमूद केलेल्या सर्व निरीक्षणांची /शिफारशींची आणि कारखान्याच्या भोगवाटादाराने सादर केलेल्या कृती अहवालाची पडताळणी केली आहे.

**सुरक्षा लेखापरीक्षकाची डिजिटल स्वाक्षरी**

**१३.** मुख्य नियमास जोडलेल्या नमुना-अ मध्ये,—

(१) अनुक्रमांक (५) येथील नोंदीमधील, "फॅक्स" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(२) अनुक्रमांक (६) येथील नोंदीमधील, "पदविका" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(३) अनुक्रमांक (७) येथील नोंदीमधील, "पदविका" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(४) अनुक्रमांक (९) येथील नोंदीनंतर, पुढील नोंदी समाविष्ट करण्यात येतील :—

(१०) पूर्ण केलेला प्रशिक्षणाचा तपशील (प्रती जोडा).

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रशिक्षणाचा विषय/ पाठ | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| | | | | |
| | | | | |

(११) अर्जाच्या शुल्काचे प्रदान केल्याचा तपशीलः

| चलन क्रमांक/ संदर्भ क्रमांक. | रक्कम | दिनांक." |
|---|---|---|
| | | |

(६) घोषणा यामधील खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ग) कारखान्याचे नाव, पत्ता व लेखापरीक्षण केल्याची तारीख दर्शविणारी यादी येथे जोडलेली आहे."

**१४.** मुख्य नियमांस जोडलेल्या नमुना- ब मध्ये,—

(१) नोंद क्रमांक (३) मधील, उप-नोंद (घ) वगळण्यात येईल ;

(२) अनुक्रमांक (५) येथील नोंदीमधील, "कर्मचाऱ्यांची वैयक्तिक माहिती" या मजकुराऐवजी, "कर्मचाऱ्यांचा तपशील" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) अनुक्रमांक (७) येथील नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईलः—

| "(८) चलन क्रमांक/ संदर्भ क्रमांक. | रक्कम | दिनांक.". |
|---|---|---|
| | | |

(४) घोषणा या मधील,—

(एक) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ग) कारखान्याचे नाव, पत्ता व लेखापरीक्षण केल्याची तारीख दर्शविणारी यादी येथे जोडलेली आहे.";

(दोन) खंड (घ) मधील, "व्यक्तींची व्यक्तिगत माहिती" या मजकुराऐवजी, "व्यक्तींचा तपशील" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(५) जोडपत्रामध्ये,—

(१) अनुक्रमांक (५) येथील नोंदीमधील, "फॅक्स" हा शब्द वगळण्यात येईल;

(२) अनुक्रमांक (७) येथील नोंदीमधील, "पदविका" हा मजकूर वगळण्यात येईल;

(३) अनुक्रमांक (८) येथील नोंदीमधील, "पदविका" हा मजकूर वगळण्यात येईल;

(४) अनुक्रमांक (८) येथील नोंदीनंतर, पुढील नोंदी समाविष्ट करण्यात येईल :—

"(९) पूर्ण केलेला प्रशिक्षणाचा तपशील (प्रती जोडा).

| अ.क्र. | संस्थेचे नाव | प्रशिक्षणाचा विषय/ पाठ | कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत". |
| | | | | |
| | | | | |

१५. मुख्य नियमांना जोडलेल्या "नमुना- क" ऐवजी, पुढील नमुना दाखल करण्यात येईल :—

**"नमुना- क"**

(नियम ६(४) पहा)

**सुरक्षा लेखापरीक्षक म्हणून मान्यतेचे प्रमाणपत्र / मान्यतेचे नूतनीकरण.**

प्रमाणपत्र क्रमांक : एमएस/ डीआयएसएचआय/ ........................ /२० ............

असे कळविण्यात येते की, मेसर्स/ श्री./ श्रीमती................................................, (पत्ता), ......................... ............................................................................................................ यांना,महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखापरीक्षण) नियम,२०१४ अन्वये सुरक्षा लेखापरीक्षण करण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाद्वारे, पत्र क्रमांक .................... दिनांक ...................... या अन्वये, "सुरक्षा लेखापरीक्षक" म्हणून मान्यता देण्यात आली आहे / मान्यतेचे नूतनीकरण करण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र, ......................पासून ......................पर्यंत वैध असेल. हे प्रमाणपत्र, यात याखाली निविष्ट केलेल्या अटींच्या अधीन राहून, देण्यात आले आहे :—

(१) महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखापरीक्षण) नियम, २०१४ मधील तरतुदींनुसार, सुरक्षा लेखापरीक्षण करण्यात येईल.

(२) प्रत्येक सुरक्षा लेखापरीक्षण, भारतीय मानक, आय एसः १४४८९ः व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य लेखापरीक्षण पद्धतीबाबत संहिता, तसेच त्याची नवीनतम आवृत्ती आणि भारतीय मानक, आय एसः १४४८९ः व्यावसायिक सुरक्षा व आरोग्य लेखापरीक्षण पद्धतीबाबत संहिता या व्यतिरिक्त वापरलेली मानके, तपासणी सूची, मार्गदर्शक तत्वे या अनुरूप असेल.

तो किंवा संस्थेच्या बाबतीत, सुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी प्राधिकृत केलेली व्यक्ती, सुरक्षा लेखा परीक्षण करतेवेळी प्रत्यक्ष उपस्थित असेल आणि केलेल्या कामाची नोंद ठेवील.

(३) सुरक्षा लेखा परीक्षण अहवालावर, न चुकता, प्रमाणपत्र क्रमांक व वैधता कालावधी, नोंदवावा.

(४) वैधता कालावधी संपल्यानंतर कोणतेही सुरक्षा लेखापरीक्षण करण्यात येणार नाही.

(५) हे प्रमाणपत्र, त्याच्या वैधतेच्या कालावधीत कोणत्याही वेळी रद्द करण्याचा, विलोपन करण्याचा किंवा त्यात सुधारणा करण्याचा हक्क, राज्य शासन राखून ठेवते.

(६) तो किंवा संस्थेच्या बाबतीत, सुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी कामावर नेमलेली व्यक्ती, ज्या कारखान्यांमध्ये असा लेखापरीक्षक किंवा व्यक्ती कामावर नेमलेली आहे अशा कोणत्याही कारखान्याचे किंवा ज्या कारखान्यामध्ये असा सुरक्षा लेखापरीक्षक नेमलेला आहे किंवा त्या कारखान्याचा भोगवटादार, भागीदार, संचालक किंवा व्यवस्थापक आहे त्या कारखान्याचा जो सहाय्यक कारखाना आहे अशा कारखान्याचे, अथवा निकट कुटुंबातील सदस्यांची, नातेवाईकांची किंवा विस्तारित कुटुंबातील सदस्यांची मालकी असलेल्या, ते कार्यान्वित करीत असलेल्या, व्यवस्थापन करीत असलेल्या किंवा चालवीत असलेल्या कोणत्याही कारखान्याचे अथवा ज्यामध्ये असा सुरक्षा लेखापरीक्षक किंवा अशी व्यक्ती कोणताही संचालक आहे किंवा त्यांचा कोणत्याही प्रकारचा अप्रत्यक्ष हितसंबंध आहे अशा कोणत्याही कारखान्याचे सुरक्षा लेखा परीक्षण करणार नाही.

**स्पष्टीकरण.–** "सहायक कारखाना" याचा अर्थ, जो दुय्यम, पुरवठादार किंवा विक्रेता आहे असा कोणताही कारखाना अथवा ज्या कारखान्यामध्ये सुरक्षा लेखापरीक्षक कामावर नेमलेला आहे अशा कारखान्यामध्ये ज्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यावसायिक हितसंबंध आहे असा कोणताही कारखाना, असा आहे.

(७) तो किंवा संस्थेच्या बाबतीत, कामावर नेमलेली व्यक्ती, कारखाना अधिनियम,१९४८ च्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे पालन करण्यासाठी ज्या कोणत्याही कारखान्यास, असा लेखापरीक्षक किंवा अशी व्यक्ती, कोणतेही संयंत्र, यंत्रसामग्री, कच्चा माल, सुरक्षा उपकरणे किंवा इतर साहित्य किंवा उपकरणे किंवा सेवा यांचा पुरवठा करते त्या कारखान्याचे सुरक्षा लेखापरीक्षण करणार नाही.

(८) सुरक्षा लेखापरीक्षक, एकाच कारखान्यात सलग दोन प्रसंगी कोणत्याही कारखान्याचे सुरक्षा लेखापरीक्षण करणार नाही;

(९) सुरक्षा लेखापरीक्षक, मागील तीन वर्षांमध्ये ज्या कारखान्याचे तो सुरक्षा लेखापरीक्षण करीत आहे अशा कोणत्याही कारखान्याचे सुरक्षा लेखापरीक्षण करणार नाही.

(१०) तो किंवा संस्थेच्या बाबतीत, सुरक्षा लेखापरीक्षण करण्यासाठी कामावर नेमलेली व्यक्ती, संस्थेच्या कर्मचाऱ्याचे मान्यताप्राप्त सुरक्षा लेखापरीक्षक असण्याचे बंद झाल्यानंतर देखील, लेखापरीक्षक म्हणून त्यांच्या कर्तव्याच्या ओघात त्यांना जी ज्ञात होऊ शकेल अशी, कोणतीही वस्तूनिर्मितीची किंवा व्यावसायिक गुपिते अथवा कामकाजाची प्रक्रिया किंवा इतर गोपनीय माहिती उघड करणार नाही. या संबंधात कोणतीही कसूर केल्यास, असा लेखापरीक्षक किंवा व्यक्ती, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार फौजदारी किंवा दिवाणी कार्यवाहीसाठी पात्र असेल.

(११) या प्रमाणपत्राची वैधता, या प्रमाणपत्रावर नमूद केलेल्या तारखेपर्यंत किंवा सुरक्षा लेखापरीक्षकाचे अठावन्न वर्षे वय पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत असेल.

(१२) एखाद्या संस्थेच्या बाबतीत, ज्या कर्मचाऱ्यांची नावे मान्यता किंवा नूतनीकरण अर्जामध्ये समाविष्ट करण्यात आली होती आणि ज्यांनी नंतर राजीनामा दिला किंवा ज्यांची सेवा समाप्त करण्यात आली किंवा जे मयत झालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांबद्दलची माहिती, तीस दिवसांच्या आत, संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, महाराष्ट्र राज्य यांना कळविण्यात येईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विनीता सिंगल,**
शासनाचे प्रधान सचिव.

## INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 19th June, 2024.

*NOTIFICATION*

Factories Act, 1948.

No. FAC-2023/CR.No.52(Part-2)/Labour-4.—In exercise of the powers conferred by section 41 read with sections 112 and 115 of the Factories Act, 1948 (63 of 1948), in its application to the State of Maharashtra and clause (3) of section 23 of the General Clause Act, 1897 (X of 1897) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Factories (Safety Audit) Rules, 2014, the same having been previously published as required by sub-section (*1*) of Section 115 of the Factories Act, 1948, as follows, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Factories (Safety Audit) (Amendment) Rules, 2024.

**2.** In rule 1 of the Maharashtra Factories (Safety Audit) Rules, 2014 (hereinafter referred to as "the principal Rules"), in sub-rule (*2*) in clause (*iii*), for the figures "250" the figures "50" shall be substituted.

**3.** In rule 2 of the principal Rules, in sub-rule (*1*), in clause (viii) after the words "means a person" the words "or an Institution," shall be inserted.

**4.** Rule 3 of the principal Rules shall be re-numbered as sub-rule (*1*) thereof ; and,—

(*a*) in sub-rule (*1*), as so re-numbered, after the second proviso the following *Explanation* shall be added,—

"*Explanation.*– For the purpose of this sub-rule "a team of Plant personnel" means a team of persons from different Departments of the factory such as Department of Safety, Engineering, Maintenance, Projects and Production, etc. In case there are different factories of the same occupier, then team of Plant personnel from other location may conduct the internal audit.";

(*b*) after sub-rule (*1*), as so re-numbered, the following sub-rule shall be added, namely :—

"(*2*) After completion of internal audit, the occupier shall submit the executive summary of observations and action taken report of the audit to the concern office of the Chief Inspector of Factories within thirty days from the date of completion of safety audit.".

**5.** For rule 4 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"**4**. The safety audit shall be carried out by the Safety Auditor or team of Plant Personnel as per the standards laid down in the Indian Standard, IS 14489 : Code of Practice on Occupational Safety and Health Audit, with its latest revision :

Provided that, the Chief Inspector may lay down separate checklists and procedures or additional checklists in addition to above standards for the purpose of conducting safety audit of all or certain class of factories. The separate checklist and procedures or additional checklist as laid down above may be altered in the month of January of every year, if required, and shall be published on the official website of the Directorate of Industrial Safety and Health by the said Directorate.".

**6.** In rule 5 of the principal Rules,—

(*a*) in sub-rule (*2*),—

(*i*) after the words "three persons" the words " who possess degree in Chemical, Electrical and Mechanical Branch," shall be inserted;

(*ii*) in the first proviso, after the words "three persons" the words "who possess degree in Chemical, Electrical and Mechanical Branch and" shall be inserted ;

(*iii*) the second proviso shall be deleted ;

(*b*) in sub-rule (*3*) the words, figures, letters and brackets "or an officer having working experience of not less than 15 years in the office of the DGFASLI or NSC or Directorate of Industrial Safety and Health (DISH) not below the rank of Deputy Director" shall be deleted.

**7.** For rule 6 of the principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

"**6.** (*1*) An application for grant of certificate of recognition as a Safety Auditor for carrying out safety audit shall be made electronically to the Chief Inspector by,—

(*a*) an individual in Form A alongwith an examination fees of rupees one thousand,

(*b*) an institution in Form B alongwith an examination fees of rupees one thousand per person who shall appear for examination of Safety Auditor, between January to March and July to September of the year. The applications received after 31st March shall be considered in the subsequent period *i.e.* July to September and the applications received after 30th September shall be considered in the subsequent period *i.e.* January to March.

(*2*) On receipt of an application duly made in accordance with these rules in Form A, the Chief Inspector shall scrutinise it and conduct a written examination of eighty marks and interview of twenty marks of eligible applicants. The Chief Inspector shall recommend the list of the selected applicants scoring fifty per cent. or more marks in written examination and also in interview to the Government for approval. The Chief Inspector shall forward the list of selected applicants,—

(*i*) by the end of April of every year for the applications received during a period of January to March, and

(*ii*) by the end of October of every year for the applications received during a period of July to September :

Provided that, the Chief Inspector shall recommend the list of only such institutes whose minimum three persons employed possess a degree in Chemical, Electrical and Mechanical Branch and all such persons have scored fifty per cent., or more marks in written examination and in interview to the Government for approval.

(*3*) On receipt of the recommendation list from the Chief Inspector, the State Government may grant approval to the applicant as a Safety Auditor or reject the application after specifying the reasons therefor, within sixty days from the date of receipt of the recommendations from the Chief Inspector.

(*4*) After approval from the Government, the applicant shall deposit a recognition fees of rupees twenty thousand to the Chief Inspector electronically within thirty days from the date of communication by the Chief Inspector. The Chief Inspector shall issue a Certificate of Recognition in Form C to the applicant within fifteen days after receipt of fees. The application shall be deemed to be cancelled on failure to deposit the fees within the said period.

(*5*) The recognition granted under sub-rule (*4*) shall be valid for a period of two years from the date of issuance of Certificate of Recognition.

(*6*) The Safety Auditor who intends to renew his Certificate of Recognition shall apply in Form A or Form B, as the case may be, to the Chief Inspector Three and half months prior to the expiry of period of validity of Certificate of Recognition.

(*7*) The applicant shall not be eligible for renewal of Certificate of Recognition as a Safety Auditor, if,—

(*a*) the Chief Inspector has revoked such recognition in the past; or

(*b*) he has obtained less than seventy per cent. marks in the performance appraisal

regarding his eligibility assessed and scrutinized by the Joint or Deputy Chief Inspector on the following points, the report of which is sent to the Chief Inspector, namely :—

(*i*) Is there any complaint regarding the safety audit from management or workers?

(*ii*) Whether the Safety Audit Report was submitted to the occupier within the prescribed time?

(*iii*) Is there any discrepancies found between details mentioned in the Safety Audit Report and the actual facts found by the officer of the Factory Inspectorate?

*Explanation*.— Joint or Deputy Chief Inspector may verify at least one or five per cent. of the audited factories by visiting the factory.

(i*v*) Whether the Safety Auditor disclosed any information relating to any manufacturing, commercial business secrets or any process secrets which came to his knowledge during the safety audit?

(*v*) Whether the Safety Auditor has conducted safety audit of the same factory consecutively two times?

(*vi*) Whether the Safety Auditor has provided any service to the factory in relation to inspection, testing, material supply or any other safety related services during last two years?

(*vii*) Whether the safety audit was conducted as per the checklist and standards as laid down in these rules?

(*viii*) Whether the safety audit was conducted after the expiry of the validity of Certificate of Recognition?

(*ix*) Whether the Safety Auditor has visited the factory to verify the action taken after three months from the date of submission of Safety Audit to the Occupier and submitted the report in Schedule III to the concerned office of Directorate?

(*x*) Whether there is any violation of the conditions prescribed in Form C?

(*xi*) Whether the Safety Auditor during the validity period of the certificate has attended at least any four training programs organized by any of the institute or organisation of the Directorate of Industrial Safety and Health, Narayan Meghaji Lokhande Shram Vidnyan Sanstha, Directorate General Factory Advice and Labour Institutes, National Safety Council, Disaster Management Institute, National Institute of Occupational Health, any other Government, Semi-Government institutes or reputed private institutes working in the field of Industrial Safety and Health?

*Explanation.*—The Chief Inspector shall collate the total marks obtained for the points (*i*) to (*x*) and evaluate the average accordingly. For the overall safety audit assessment the maximum marks for points (*i*) to (*x*) shall be eighty marks, and for point (xi) shall be twenty marks.

(*8*) The applications received for renewal of recognition shall be assessed and scrutinised by the Chief Inspector within forty five days from the date of receipt of such applications. Thereafter, the Chief Inspector shall forward the recommendation list for renewal of Certificate of Recognition to the Government for its approval. The Chief Inspector shall recommend to the Government to reject the renewal of the Certificate of Recognition, if it is found that the Safety Auditor has not complied with the requirement specified in sub-clauses (*ii*), (*iv*), (*v*) and (*xi*) of clause (b) of sub-rule (*7*).

(*9*) The Government shall send the list of approved Safety Auditor to the Chief Inspector within sixty days from the date of receipt of the recommendation list for issuance of Certificate of Recognition.

(*10*) After receipt of an approval from the Government, the applicant shall pay renewal fees of rupees ten thousand electronically to the Chief Inspector and then the Chief Inspector shall issue the Certificate of Recognition to the applicant in Form C.

(*11*) The Chief Inspector may, after giving an opportunity to the Safety Auditor of being heard and after approval of the State Government revoke the Certificate of Recognition, if it has a reasons to believe that,—

(*i*) the Safety Auditor has violated any of the conditions stipulated in the Certificate of Recognition or renewal of Certificate of Recognition; or

(*ii*) the Safety Auditor has carried out the safety audit in violation of the provisions of the Act or these rules or has acted in a manner inconsistent with the intent or the purpose of the Act or rules made thereunder or has omitted or failed to act as required under the Act and rules made thereunder; or

(*iii*) the work of Safety Auditor is found unsatisfactory, and the Chief Inspector has issued warning notice to such Auditor on two occasions.".

**8.** In rule 7 of the principal Rules,—

(*a*) for the words "in writing" the word "electronically" shall be substituted; and

(*b*) for the word "fifteen" the word "seven" shall be substituted.

**9.** After rule 7 of the principal Rules, the following rules shall be inserted, namely :—

"**7A.** (1) To carry out the safety audit, the minimum required man days shall be as follows, namely :—

(*a*) Major Accident Hazards Factories and for factories carrying out hazardous processes :—

(*i*) One man day in case of factory employing up to fifty workers;

(*ii*) Two man days in case of factory employing fifty one workers upto one hundred and fifty workers;

(*iii*) Three man days in case of factory employing one hundred and fifty one to five hundred workers;

(*iv*) Four man days in case of factory employing more than five hundred workers;

(*b*) Factories other than Major Accident Hazards Factories and factories carrying out hazardous processes :

(*i*) Two man days in case of factory employing fifty-one to two hundred and fifty workers;

(*ii*) Three man days in case of factory employing two hundred and fifty one to one thousand workers;

(*iii*) Four man days in case of factory employing more than one thousand workers.

(*2*) The duration required to conduct the safety audit shall not exceed fifteen days.

**7-B.** The Safety Audit shall be carried out only by an Institution having Certificate of Recognition in the following types of factories, namely :—

(*a*) Major Accident Hazards Factories;

(*b*) Factories carrying out hazardous processes and employing more than two hundred and fifty workers;

(*c*) Other factories not covered under sub-rule (*2*)(*i*) and (*ii*) of rule 1 and employing more than one thousand workers:

Provided that, for the factories mentioned in clause (c), inclusion of person of Chemical Engineer in the audit team is not mandatory."

**10.** Rule 9 of the principal Rules shall be renumbered as sub-rule (*1*) thereof; and after sub-rule (*1*), as so re-numbered, the following sub-rule shall be added, namely :—

"(*2*) The Safety Auditor shall visit the factory within one month after expiry of three months from the date of submission of external Safety Audit Report to the occupier to verify the action taken report submitted by the occupier of the concerned factory and the report of the same shall be submitted to the concerned office of the Directorate of Industrial Safety and Health in Schedule III with a copy to occupier.".

**11.** In *Schedule I* appended to the principal Rules,—

(*i*) for sub-clause (*i*), the following sub-clause shall be substituted, namely :—

"(*i*) degree in branch of Chemical, Mechanical, Electrical or Production branch Engineering and having ten years' experience in manufacturing, maintenance, design, project or safety department in the supervisory or above capacity in factories and one year full time diploma in Industrial Safety recognized by the Board of Technical Education or All India Council of Technical Education or recognized University ", or

(*ii*) sub-clauses (*ii*) and (*iii*) shall be deleted ;

(*iii*) in sub-clause (*iv*),—

(*a*) the words "or diploma" shall be deleted ;

(*b*) for the words "fifteen" the words "five" shall be substituted ;

(*2*) in clause 3, the following clause shall be substituted, namely :—

3. "Applicant whose age is more than fifty eight years shall not be eligible to apply for recognition as a safety auditor or its renewal."

**12.** For *Schedule II* appended to the principal Rules, the following *Schedule* shall be substituted, namely :—

*Schedule II*

[*See rules* 8 and 9(1)]

Proforma for Safety Audit Report

*Part-A*

(to be furnished by the Safety Auditor)

(*1*) Name and address of the factory:

(*2*) Name of the Occupier:

(*3*) (*a*) Date and time of opening meeting of safety audit:

(*b*) Date and time of closing meeting of safety audit:

(*c*) Total man days taken to conduct the safety audit:

(*4*) List of raw material with maximum storage quantity and its mode of storage:

(*5*) List of finished products with maximum storage quantity and its mode of storage:

(*6*) Manufacturing process flow chart (attach separate sheet):

(*7*) List of dangerous operations carried out in the factory as defined in rule 114 of the Maharashtra Factories Rules, 1963 :

(*8*) (*a*) Name/s of the Safety Auditor/s:

(*b*) Certificate no. and it's validity duration:

(*9*) Whether enclosed Safety Audit Report is as per the Indian Standard, IS 14489 : Code of Practice on Occupational Safety and Health Audit, or any such standards prevailing at the relevant time, whichever is latest : (mention standards, check list, guidelines used in addition to the Indian Standard, IS 14489 : Code of Practice on Occupational Safety and Health Audit)

(Detailed Safety Audit Report along with recommendations to be attached.)

Date of submission of Safety Audit Report to the factory:

Digital Signature of Safety Auditor/s or employee/s of an Institution authorized to carry out safety audit.

In case of Internal Safety Audit

Signatures of Team of Plant Personnel.

*Part-B*

(*to be furnished by the occupier*)

Date of receipt of safety audit from the Safety Auditor:

I ……………………………… undersigned occupier of the factory ……………………………………. situated at .................................. hereby declare that, I have thoroughly reviewed and taken appropriate actions based on the findings and recommendations mentioned in Safety Audit Report by safety auditor/s namely ………………………..

In response to the Safety Audit Report I have taken appropriate measures and report of the same is attached herewith.

Digital Signature of the Occupier.

*Schedule III*

[*See* rule 9(*2*)]

Proforma for verification of action taken report

(*1*) Name and address of the factory :

(*2*) Name of the Occupier :

(*3*) Name of Safety Auditor :

(*4*) Date of Safety Audit :

(*5*) Date of submission of Safety Audit report to Occupier :

(*6*) Date of action taken report submitted by Occupier :

(*7*) Date of visit for verifying action taken report :

(*8*) Details of non-compliance observed, if any:

I ……………, hereby declare that I have verified all the observation / recommendation mentioned in Safety Audit report and action taken report submitted by the occupier of the factory.

Digital signature of the Safety Auditor.".

**13.** In Form A appended to the principal Rules,—

(*1*) in entry at serial number (5), the word "Fax" shall be deleted;

(*2*) in entry at serial number (6) the word "Diploma" shall be deleted;

(*3*) in entry at serial number (7) the word "Diploma" shall be deleted;

(*4*) after entry at serial number (9), the following entries shall be inserted, namely :—

"*(10)* Details of the training attended (attach copies).

| Sr. No. | Name of the Institution | Subject / Topics of the training | Duration | |
|---|---|---|---|---|
| | | | From | To |
| | | | | |
| | | | | |

(*11*) Details of Payment of fees for application :

| Challan No./ Reference No. | Amount | Date". |
|---|---|---|
| | | |

(*6*) in the DECLARATION, for clause (*c*) the following clause shall be substituted, namely :—

"(*c*) The list showing the name, address of the factory and date of audits are attached herewith.".

**14.** In Form B appended to the principal Rules,—

(*1*) in entry at serial number (3), sub-entry (*d*) shall be deleted;

(*2*) in entry at serial number (5), for the words "bio-data" the word "details " shall be substituted;

(*3*) after entry at serial number (7) the following entry shall be inserted, namely :—

| "(8) Challan No./ Reference No. | Amount | Date"; |
|---|---|---|
| | | |

(*4*) in the DECLARATION,—

(*i*) for clause (c), the following clause shall be substituted, namely :—

"(*c*) The list showing the name, address of the factory and date of audits are attached herewith.";

(*ii*) in clause (*d*), for the words "bio-data it" the word "details" shall be substituted ;

(*5*) in Annexure,—

(*i*) in entry at serial number (5), the word "Fax" shall be deleted ;

(*ii*) in entry at serial (6), the word "Diploma" shall be deleted ;

(*iii*) in entry at serial (7), the word "Diploma" shall be deleted ;

(*iv*) after entry at serial number (8), the following entry shall be added, namely :—

"9. Details of the training attended (attached copies).

| Sr. No. | Name of the Institution | Subject / Topics of the training | Duration | |
|---|---|---|---|---|
| | | | From | To". |
| | | | | |
| | | | | |

**15.** For FORM C, appended to the principal Rules, the following FORM shall be substituted, namely :—

**"Form C"**

[*See* rule 6(4)]

**Certificate of recognition / renewal of recognition as a Safety Auditor.**

**Certificate No. : MS/DISH/SA/ ......................... /20 .........................**

It is to inform that M/S. / SHRI / SMT........................., (address), ................................................ been Recognised / Renewed the recognition as a "SAFETY AUDITOR", by the State Government, *vide* letter No. ....................... dated .......................for the purpose of carrying out Safety Audit under Maharashtra Factories (Safety Audit) Rules, 2014.

The Certificate is valid from .......................to .......................

Audit under Maharashtra Factories (Safety Audit) Rules, 2014.

This certificate is issued subject to the conditions stipulated hereunder :—

(*1*) Safety audit shall be carried out in accordance with the provisions of the Maharashtra Factories (Safety Audit) Rules, 2014.

(*2*) Every safety audit shall conform to the Indian Standard, IS 14489 : Code of Practice on Occupational Safety and Health Audit with its latest revision and additional standard, check list, guidelines used in addition to the Indian Standard, IS 14489 : Code of Practice on Occupational Safety and Health Audit.

He or the person authorized, in case of the institution, to carry out safety audit shall be physically present at the time of conducting the Safety Audit and shall maintain the record of the work done.

(*3*) Certificate Number and validity period should be invariably recorded on Safety Audit Report.

(*4*) No safety audit shall be carried out after expiry of validity period.

(*5*) The State Government reserves the right to revoke, annul or amend this Certificate at any time during its validity.

(*6*) He or the person employed, in case of the institution, to carry out safety audit shall not conduct a Safety Audit of any factory where such auditor or person is employed or of any factory which is ancillary factory of the factory in which the such auditor is employed or an occupier, partner, director, or manager of that factory, or of any factory owned, operated, managed, or conducted by immediate family members, relatives or extended family members or wherein that auditor or such person has any direct or indirect interest whatsoever.

*Explanation.*— "ancillary factory" means any factory which is subsidiary, supplier or vendor or any such factory which has directly or indirectly commercial interest of such factory in which safety auditor is employed.

(*7*) He or the person employed, in case of the institution, shall not conduct a Safety Audit of any factory to which that auditor or such person supplies any plant, machinery, raw material, safety equipment's or other materials or equipment or services towards the compliance of provisions of the Factories Act, 1948 or rules made there under.

(*8*) Safety Auditor shall not conduct a Safety Audit of any factory consecutively on two occasions in the same factory;

(*9*) Safety Auditor shall not conduct a Safety Audit of any factory where he has carried out safety audit within last three years.

(*10*) He or the person employed, in case of the institution, to carry out safety audit shall not disclose, even after ceasing to be a recognized Safety Auditor of the employee of the institution, any manufacturing or commercial secrets or working processes or other confidential information which may come to his knowledge in the course of their duties as an auditor. Any failure in this regard may make such auditor or person liable for criminal or civil proceedings, in accordance with the law for the time being in force.

(*11*) The validity of this certificate is till the date mentioned on this certificate or completion of age fifty eight years of the safety auditor, whichever is earlier.

(*12*) In case of an Institutions, information about employees whose names were included in the recognition or renewal application and who subsequently resign or terminated or pass away shall be communicated to Director, Industrial Safety and Health, Maharashtra State, within thirty days.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VINITA SINGAL,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.